प्रेस नोट

## रेकॉर्ड वरील सराईत गुन्हेगारास गुन्हे शाखा, युनिट ४ कडुन अटक, घरफोडी चोरीचे १३ गुन्हे उघड, ३ लाख रुपयाचे सोन्याचे दागिने जप्त

पुणे शहर व पिंपरी चिंचवड मध्ये घडत असलेल्या घरफोडी चोरीच्या गुन्ह्यातील आरोपींचे मागावर गुन्हे शाखा, युनिट ४ कडील पोलीस पथक होते. पुणे शहरामधील घरफोड्या चोऱ्या करणारे पोलीस रेकॉर्ड वरील जेलचे बाहेर असणारे घरफोडी करणारे सराईत गुन्हेगारा बाबत माहीती घेत असताना गुन्हे शाखा, युनिट ४ कडील सहा.पोलीस निरीक्षक नितीन भोयर व पोलीस नाईक गणेश काळे यांना माहीती मिळाली की, पोलीस रेकॉर्ड वरील सराईत गुन्हेगार नामे अंकुश लक्ष्मण लष्करे हा सध्या अहमनगर येथे वास्तव्यास असुन त्याने पुणे शहरामध्ये येवुन घरफोड्या चोऱ्या केल्या आहेत. सदर मिळाले माहीती वरून युनिट ४ कडील सपोनि नितीन भोयर, पो.हवा. राजु मचे, धर्मराज आवटे, प्रमोद वेताळ, गणेश काळे यांचे पथकाने आरोपी अंकुश लक्ष्मण लष्करे, वय २९ वर्षे, रा.मु.पो. केडगाव, ता. जि. अहमदनगर यांस केडगांव अहमदनगर येथुन त्याचे राहते घराचे परीसरातुन शिताफिने पकडुन त्याचेकडे केले तपासामध्ये त्याने पुणे शहरामध्ये येवून गुन्हे केल्याची कबुली दिल्याने त्यास निगडी पोलीस ठाणे कडील घरफोडी चोरीच्या गुन्ह्यामध्ये दि.३/०१/२०१७ रोजी अटक करण्यात आली आहे.

आरोपीची मा.न्यायालयाकडुन दि.१२/०१/२०१७ रोजी पर्यंत पोलीस कस्टडी रिमांड घेण्यात आली आहे. पोलीस कस्टडी दरम्यान त्याचेकडे अधिक तपास करता त्याचेकडून सहकारनगर पो.स्टे. कडील ५ गुन्हे, सांगवी पो.स्टे. कडील ४ गुन्हे, निगडी पो.स्टे. कडील ३ व पिंपरी पो.स्टे. कडील १ असे एकुण १३ घरफोडी चोरीचे गुन्हे उघडकीस आले असुन त्यामधिल कि.रू ३,००,०००/- चे सोन्याचे दागिने व मोबाईल जप्त करण्यात आला आहे.

आरोपी अंकुश लक्ष्मण लष्करे हा ओटास्किम, निगडी येथे राहणेस होता परंतु काही दिवसापासुन तो केडगाव, ता. जि. अहमदनगर येथे त्याचे बायको मुलासंह राहणेस आहे. आरोपी हा अहमदनगर येथुन रात्रीच्या वेळी एस.टीने पुणे येथे येवुन बंद घरांची पाहणी करून घरफोडी चोरी करायचा व पुन्हा सकाळी अहमदनगर येथे त्याचे राहते घरी जात असे. आरोपीचा पुर्वी झालेल्या अपघाता मधिल उपचारा दरम्यान झालेल्या कर्जा पोटी घरातील दागिने विकत असल्याने खोटे कारण सोनारास सांगुन घरफोडी मिळालेले सोन्याचे दागिने विकत असे, आरोपी याचे विरूध्द पुणे शहरामध्ये यापुर्वी ५० हुन अधिक घरफाडी चोरीचे गुन्हे दाखल आहेत.

सदरची कारवाई गुन्हे शाखेचे अपर पोलीस आयुक्त दिपक साकोरे, पोलीस उप आयुक्त पी.आर.पाटील, सहा.पोलीस आयुक्त आयुक्त अरूण वालतुरे, यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा, युनिट ४ चे पोलीस निरीक्षक राजेंद्र तोडकर, सहा.पोलीस निरीक्षक नितीन भोयर, सहा.पोलीस निरीक्षक गणेश पाटील, पोलीस उप निरीक्षक विलास पालांडे, पोलीस कर्मचारी दिलीप लोखंडे, संजय गवारे, राजेंद्र शेटे, धर्मराज आवटे, राजु मचे, प्रमोद लांडे, सलीम शेख, जितेंद्र अंभगराव, प्रविण दळे, अमित गायकवाड, प्रमोद वेताळ, गणेश काळे, , हेमंत खरात, प्रमोद हिरळकर, स्वप्नील शिंदे, सुनिल चौधरी व गोपाल ब्राहमदे यांनी केली आहे.